खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२२ – २३

### गोखले अर्थशास्त्र संस्थेशी एम.ओ.यु.

लोकमत

# राजगुरू महाविद्यालयाचा गोखले अर्थशास्त्र संस्थेशी करार

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरुनगर : खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे हुतात्मा राजगुरु महाविद्यालयाने गोखले अर्थशास्त्र संस्था या अभिमत विद्यापीठाबरोबर सामंजस्य कराराचे हस्तांतरण करण्यात आले.

गोखले संस्थेचे कुलगुरु डॉ. अजित रानडे यांच्या हस्ते महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी कराराचा स्वीकार केला. याप्रसंगी उपप्राचार्य व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. पी. एस. कुलकर्णी, डॉ. गणेश धुमाळ, प्रा. संदीप थोरात उपस्थित होते.

या करारानुसार महाविद्यालयाने निवडलेल्या गावांमध्ये शाश्वत ग्रामीण विकासासाठी जैवविविधता, जलसंवर्धन, गुणवत्तापूर्ण विकास शिक्षण, स्वास्थ्यपूर्ण आरोग्य, हरित ऊर्जा, स्थानिक विकास प्रशासन सक्षमीकरण आणि शाश्वत शेती या विषयांवर समस्या संशोधन, प्रशिक्षण आणि समस्या निराकरण उपाय करण्यात येणार आहेत.



गोखले संस्थेचे कुलगुरु डॉ. अजित रानडे यांच्या हस्ते महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी कराराचा स्वीकार केला.

विद्यार्थ्यांनी त्यांच्या परिसरातील विकासासंबंधी विविध विषयांवर काम करावे, त्यातून तयार झालेला संशोधन प्रकल्प अहवाल शासनाच्या धोरण निश्चितीसाठी आवश्यक ठरेल, असे कुलगुरु डॉ. अजित रानडे यांनी सांगितले. शिक्षणाला ग्रामीण विकासाशी जोडणाऱ्या योजनांमध्ये विद्यार्थ्यांना सहभागी करून घेण्यात येणार असल्याचे शाश्वत ग्रामविकास केंद्राचे समन्वयक डॉ. कैलास बवले यांनी सांगितले.

प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी या पथदर्शी प्रकल्पाच्या कृती नियोजनात महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी आणि स्थानिक प्रशासनाच्या सहकार्याने ज्ञानग्राम निर्मितीचा संकल्प यशस्वीपणे राबविण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. गोखले अर्थशास्त्र संस्थेबरोबर झालेल्या सामाजिक स्वीकारल्याबद्दल हुतात्मा राजगुरु महाविद्यालयाचे अभिनंदन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर यांनी केले.

Hello Pune Gramin
Page No. 4 Sep 20, 2022
Powered by: erelego.com

केसरी
राष्ट्रीय ठेवा

# राजगुरु महाविद्यालयाचा ज्ञानग्राम उपक्रमासाठी गोखले अर्थशास्त्र संस्थेशी सामंजस्य करार



**राजगुरूनगर, (वार्ताहर) :** येथील खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाने गोखले अर्थशास्त्र संस्था या अभिमत विद्यापीठाबरोबर उच्च शिक्षणाला ग्रामीण विकासाशी जोडणाऱ्या उन्नत भारत व उन्नत महाराष्ट्र अभियानांतर्गत नॉलेज कॉलेज व्हिलेज सहयोग योजना व ज्ञानग्राम उपक्रमांचा पथदर्शी प्रकल्प राबविण्यासाठी नुकत्याच एका समारंभात सामंजस्य कराराचे हस्तांतरण करण्यात आले. गोखले संस्थेचे कुलगुरू डॉ. अजित रानडे यांच्या हस्ते महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी कराराचा स्वीकार केला. या प्रसंगी उपप्राचार्य व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. पी. एस. कुलकर्णी, डॉ. गणेश धुमाळ, प्रा. संदीप थोरात उपस्थित होते.

या करारानुसार महाविद्यालयाने निवडलेल्या गावांमध्ये शाश्वत ग्रामीण विकासासाठी जैवविविधता, जलसंवर्धन, गुणवत्तापूर्ण विकास शिक्षण, स्वास्थपूर्ण आरोग्य, हरित ऊर्जा, स्थानिक विकास प्रशासन सक्षमीकरण आणि शाश्वत शेती या विषयांवर समस्या संशोधन, प्रशिक्षण आणि समस्या निराकरण उपाय करण्यात येणार आहेत.

विद्यार्थ्यांनी त्यांच्या परिसरातील विकासासंबंधी विविध विषयांवर काम करावे, त्यातून तयार झालेला संशोधन प्रकल्प अहवाल शासनाच्या धोरण निश्चितीसाठी आवश्यक ठरेल असे कुलगुरू डॉ. अजित रानडे यांनी सांगितले. शिक्षणाला ग्रामीण विकासाशी जोडणाऱ्या योजनांमध्ये विद्यार्थ्यांना सहभागी करून घेण्यात येणार असल्याचे शाश्वत ग्राम विकास केंद्राचे समन्वयक डॉ. कैलास बवले यांनी सांगितले. प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी या पथदर्शी प्रकल्पाच्या कृती नियोजनात महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी आणि स्थानिक प्रशासनाच्या सहकार्याने ज्ञानग्राम निर्मितीचा संकल्प यशस्वीपणे राबविण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. गोखले अर्थशास्त्र संस्थेबरोबर झालेल्या सामाजिक करार स्वीकारल्याबद्दल हुतात्मा राजगुरु महाविद्यालयाचे अभिनंदन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर यांनी केले.

# गोखले अर्थशास्त्र संस्थेशी राजगुरू महाविद्यालयाचा करार

राजगुरुनगर, दि. २० (प्रतिनिधी) - खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाने गोखले अर्थशास्त्र संस्था या अभिमत विद्यापीठ बरोबर उच्च शिक्षणाला ग्रामीण विकासाशी जोडणाऱ्या उन्नत भारत व उन्नत महाराष्ट्र अभियानांतर्गत नॉलेज कॉलेज व्हिलेज सहयोग योजना व ज्ञानग्राम उपक्रमांचा पथदर्शी प्रकल्प राबविण्यासाठी नुकत्याच एका समारंभात सामंजस्य कराराचे हस्तांतरण करण्यात आले.



पुणे येथे गोखले संस्थेचे कुलगुरू डॉ. अजित रानडे यांच्या हस्ते महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी कराराचा स्वीकार केला. याप्रसंगी उपप्राचार्य व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. पी. एस. कुलकर्णी, डॉ. गणेश धुमाळ, प्रा. संदीप थोरात उपस्थित होते. या करारानुसार महाविद्यालयाने निवडलेल्या गावामध्ये शाश्वत ग्रामीण विकासासाठी जैव विविधता, जल संवर्धन, गुणवत्तापूर्ण विकास शिक्षण, स्वास्थ्यपूर्ण आरोग्य, हरित ऊर्जा, स्थानिक विकास प्रशासन सक्षमीकरण आणि शाश्वत शेती या विषयांवर समस्या संशोधन, प्रशिक्षण आणि समस्या निराकरण उपाय करण्यांत येणार आहेत.

विद्यार्थ्यांनी त्यांच्या परिसरातील विकासासंबंधी विविध विषयांवर काम करावे, त्यातून तयार झालेला संशोधन प्रकल्प अहवाल शासनाच्या धोरण निश्चितीसाठी आवश्यक ठरेल असे कुलगुरू डॉ. अजित रानडे यांनी सांगितले. शिक्षणाला ग्रामीण विकासाशी जोडणाऱ्या योजनांमध्ये विद्यार्थ्यांना सहभागी करून घेण्यात येणार असल्याचे शाश्वत ग्राम विकास केंद्राचे समन्वयक डॉ. कैलास बवले यांनी सांगितले. प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी या पथदर्शी प्रकल्पाच्या कृती नियोजनात महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी आणि स्थानिक प्रशासनाच्या सहकार्याने ज्ञानग्राम निर्मितीचा संकल्प यशस्वीपणे राबविण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. गोखले अर्थशास्त्र संस्थेबरोबर झालेल्या सामाजिक स्वीकारल्याबद्दल हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाचे अभिनंदन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर यांनी केले.



राजगुरू महाविद्यालयाने गोखले संस्थेबरोबर सामंजस्य करार केला.

# राजगुरू महाविद्यालयाचा गोखले अर्थशास्त्र संस्थेशी करार

**राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा**

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाने गोखले अर्थशास्त्र संस्था या अभिमत विद्यापीठाबरोबर नॉलेज कॉलेज व्हिलेज सहयोग योजना व ज्ञानग्राम उपक्रमांचा पथदर्शी प्रकल्प राबविण्यासाठी सामंजस्य कराराचे हस्तांतरण करण्यात आले.

उच्च शिक्षणाला ग्रामीण विकासाशी जोडणाऱ्या उन्नत भारत व उन्नत महाराष्ट्र अभियानांतर्गत हा करार झाला. गोखले संस्थेचे कुलगुरू डॉ. अजित रानडे यांच्या हस्ते महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी कराराचा स्वीकार केला. उपप्राचार्य व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. पी. एस. कुलकर्णी, डॉ. गणेश धुमाळ, प्रा. संदीप थोरात उपस्थित होते. करारानुसार महाविद्यालयाने निवडलेल्या गावात शाश्वत ग्रामीण विकासासाठी जैवविविधता, जलसंवर्धन, गुणवत्तापूर्ण विकास शिक्षण, स्वास्थ्यपूर्ण आरोग्य आदी कामे करणार आहेत.

विद्यार्थ्यांनी त्यांच्या परिसरातील विकासासंबंधी विविध विषयांवर काम करावे, त्यातून तयार झालेला संशोधन प्रकल्प अहवाल शासनाच्या धोरणनिश्चितीसाठी आवश्यक ठरेल, असे कुलगुरू डॉ. अजित रानडे यांनी सांगितले. शिक्षणाला ग्रामीण विकासाशी जोडणाऱ्या योजनांमध्ये विद्यार्थ्यांना सहभागी करून घेणार असल्याचे शाश्वत ग्रामविकास केंद्राचे समन्वयक डॉ. कैलास बवले यांनी सांगितले. प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी या पथदर्शी प्रकल्पाच्या कृती नियोजनात प्राध्यापक, विद्यार्थी आणि स्थानिक प्रशासनाच्या सहकार्याने ज्ञानग्रामनिर्मितीचा संकल्प यशस्वीपणे राबविण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

कराराबद्दल हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाचे अभिनंदन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर यांनी केले.

My Gramin Edition
Sep 21, 2022 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

# राजगुरू महाविद्यालयाचा ज्ञानग्राम उपक्रमासाठी गोखले अर्थशास्त्र संस्थेशी सामंजस्य करार

**राजगुरूनगर (दै. संध्या) :**

येथील खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाने गोखले अर्थशास्त्र संस्था या अभिमत विद्यापीठाबरोबर उच्च शिक्षणाला ग्रामीण विकासाशी जोडणाऱ्या उन्नत भारत व उन्नत महाराष्ट्र अभियानांतर्गत नॉलेज कॉलेज व्हिलेज सहयोग योजना व ज्ञानग्राम उपक्रमांचा पथदर्शी प्रकल्प राबविण्यासाठी नुकत्याच एका समारंभात सामंजस्य कराराचे हस्तांतरण करण्यात आले. गोखले संस्थेचे कुलगुरू डॉ. अजित रानडे यांच्या हस्ते महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी कराराचा स्वीकार केला. या प्रसंगी उपप्राचार्य व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. पी. एस. कुलकर्णी, डॉ. गणेश धुमाळ, प्रा. संदीप थोरात उपस्थित होते.



या करारानुसार महाविद्यालयाने निवडलेल्या गावामध्ये शाश्वत ग्रामीण विकासासाठी जैवविविधता, जलसंवर्धन, गुणवत्तापूर्ण विकास शिक्षण, स्वास्थ्यपूर्ण आरोग्य, हरितऊर्जा, स्थानिक विकास प्रशासन सक्षमीकरण आणि शाश्वत शेती या विषयांवर समस्या संशोधन, प्रशिक्षण आणि समस्या निराकरण उपाय करण्यात येणार आहेत.

विद्यार्थ्यांनी त्यांच्या परिसरातील विकासासंबंधी विविध विषयांवर काम करावे, त्यातून तयार झालेला संशोधन प्रकल्प अहवाल शासनाच्या धोरण निश्चितीसाठी आवश्यक ठरेल असे कुलगुरू डॉ. अजित रानडे यांनी सांगितले. शिक्षणाला ग्रामीण विकासाशी जोडणाऱ्या योजनांमध्ये विद्यार्थ्यांना सहभागी करून घेण्यात येणार असल्याचे शाश्वत ग्राम विकास केंद्राचे समन्वयक डॉ. कैलास बवले यांनी सांगितले.

प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी या पथदर्शी प्रकल्पाच्या कृती नियोजनात महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी आणि स्थानिक प्रशासनाच्या सहकार्याने ज्ञानग्राम निर्मितीचा संकल्प यशस्वीपणे राबविण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

गोखले अर्थशास्त्र संस्थेबरोबर झालेल्या सामाजिक करार स्वीकारल्याबद्दल हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाचे अभिनंदन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर यांनी केले.

सकाळ

## गावांमध्ये ज्ञानग्राम उपक्रम राबविणार : विद्यार्थ्यांचा असणार सहभाग

# राजगुरू महाविद्यालयाचा गोखले संस्थेशी करार

**राजगुरुनगर, ता. २४ :** खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाने, गोखले अर्थशास्त्र संस्था या अभिमत विद्यापीठाबरोबर उच्च शिक्षणाला ग्रामीण विकासाशी जोडणाऱ्या उन्नत भारत व उन्नत महाराष्ट्र अभियानांतर्गत, नॉलेज कॉलेज व्हिलेज सहयोग योजना व ज्ञानग्राम उपक्रमांचा पथदर्शी प्रकल्प राबविण्यासाठी नुकत्याच एका समारंभात सामंजस्य कराराचे हस्तांतरण केले.



**राजगुरुनगर (ता. खेड) : गोखले अर्थशास्त्र संस्थेबरोबर झालेल्या सामंजस्य कराराची प्रत स्वीकारताना प्राचार्य शिरीष पिंगळे व मान्यवर.**

गोखले संस्थेचे कुलगुरू डॉ. अजित रानडे यांच्या हस्ते महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी कराराचा स्वीकार केला. या प्रसंगी उपप्राचार्य व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. पी. एस. कुलकर्णी, डॉ. गणेश धुमाळ, प्रा. संदीप थोरात उपस्थित होते.या करारानुसार महाविद्यालयाने निवडलेल्या गावामध्ये शाश्वत ग्रामीण विकासासाठी जैव विविधता, जल संवर्धन, गुणवत्तापूर्ण विकास शिक्षण, स्वास्थ्यपूर्ण आरोग्य, हरित ऊर्जा, स्थानिक विकास प्रशासन सक्षमीकरण आणि शाश्वत शेती या विषयांवर समस्या संशोधन, प्रशिक्षण आणि समस्या निराकरण उपाय करण्यात येणार आहेत.

विद्यार्थ्यांनी त्यांच्या परिसरातील विकासासंबंधी विविध विषयांवर काम करावे. त्यातून तयार झालेला संशोधन प्रकल्प अहवाल शासनाच्या धोरण निश्चितीसाठी उपयोगी ठरेल, असे कुलगुरू डॉ. अजित रानडे यांनी सांगितले. शिक्षणाला ग्रामीण विकासाशी जोडणाऱ्या योजनांमध्ये विद्यार्थ्यांना सहभागी करून घेण्यात येणार असल्याचे शाश्वत ग्राम विकास केंद्राचे समन्वयक डॉ. कैलास बवले यांनी सांगितले.

या पथदर्शी प्रकल्पाच्या कृती नियोजनात महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी आणि स्थानिक प्रशासनाच्या सहकार्याने ज्ञानग्राम निर्मितीचा संकल्प यशस्वीपणे राबविण्याचा प्रयत्न करणार असल्याचे प्राचार्य डॉ. पिंगळे यांनी सांगितले.

गोखले अर्थशास्त्र संस्थेबरोबर झालेल्या सामंजस्य कराराबद्दल, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर यांनी हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाचे अभिनंदन केले.

Pune, District-Today
25/09/2022 Page No. 4

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभाग प्रमुख**